फौ.कि.अ.क्र.१४४/२०२४
पल्लवी वि. आकाश व.२

<u>निशाणी १ खालील</u>

**<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u> –**

<u>देवाशपथ खरे सांगतो की</u>,

माझे नाव – दत्तात्रय एकनाथ सुर्यवंशी,

वय – ५९, धंदा – सेवानिवृत्त,

रा. जयसिंगपुर, ता.तासगांव, जि. सांगली.

दिनांक ०१.१२.२०२१ रोजी माझी मुलगी पल्लवी हिचे आकाश सावंत याच्याशी अंकली, जयसिंगपुर येथे कार्यालयात लग्न करुन दिलेले आहे. वीस तोळे सोने घालुन थाटामाटात लग्न करुन दिलेले आहे. माझ्या मुलीला तीन ते चार महिने व्यवस्थीत नांदवले परंतु त्यानंतर पैशाच्या कारणांवरुन तिला टोमणे मारणे, शारिरिक व मानसिक त्रास देणे सुरु केले. दिवाळीच्या आधी आठ दिवस माझ्या मुलीचे पती तिला वकिलांकडे घटस्फोटासाठी घेवुन गेले होते. त्यावेळी वकिलांनी सांगितले होते की तुम्ही आठ दिवस व्यवस्थीत रहा त्यानंतर मी बोलावुन घेतो.

२. दिनांक १२.११.२०२४ रोजी सकाळी ८ ते ९.०० वाजण्याच्या सुमारास माझ्या मुलीचे सासरे तिच्या बेडरुममध्ये गेले व ते तिला म्हणाले की तुला आज वकिलांकडे जायचे आहे, तुला घटस्फोट द्यावा लागणार आहे. त्यावेळी माझी मुलगी त्यांना म्हणाली की आपण घरी समझोता करु व तिने नकार दिला त्यावेळी तिचे सासरे तिला जबरदस्तीने बेडरुमबाहेर घेवुन आले त्यावेळी तिचे सासरे यांनी माझ्या मुलीचा विनयभंग केला. माझ्या मुलीला बेडरुममधून हॉलमध्ये आणेयपर्यंत तिच्या हातामध्ये मोबाईल होता त्यावेळी तिथे माझ्या मुलीचा पती व सासु देखिल होते. त्यांना असे वाटले की माझी मुलगी रेकॉर्डींग करित आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या मुलीचा मोबाईल फोडला. त्यावेळी माझी मुलगी गोळा करित असतांना माझ्या मुलीच्या पतीने तिला दाबुन धरले. सासुने तिचा डावा हात पिरगाळला. त्यानंतर ती सुटका करुन घेत असतांना तिला मारहाण झाली व दुखापत देखिल झाली. घटस्फोट दे व घर सोडुन जा अशी तिला धमकी दिली. जर घर सोडुन गेली नाहीत तर तुला आम्ही मारुन टाकू

अशीदेखिल धमकी दिली. त्यादिवशी माझी मुलगी एकटी व ते तिनजण होते. त्या तिघांनी माझ्या मुलीवर अन्याय केला आहे.

३. माझी मुलगी दुस–या मजल्यावर राहाते व पहिल्या मजल्यावर चुलत सासरे राहतात. माझी मुलगी तिचे चुलत सास–यांकडे जावून त्यांच्या फोनवरुन आम्हाला कळवले. त्यावेळी चुलत सासरे यांनी देखिल मला सांगितले की काहीतरी मोठी घटना घडलेली आहे, तुम्ही या. त्या दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास मी, माझा मुलगा, माझे सासरे व मामेभाऊ असे मिळुन माझे मुलीच्या चुलत सासरे यांच्या घरी गेलो. चुलत सासरे व सासरे यांनी शेजारी राहणा–या नातेवाईकांना बोलावुन घेतले. सर्वासमक्ष घटना कशी घडली याबाबत मुलीचा जबाब घेतला. त्यानंतर मुलीला सांभाळुन घ्या, असे आम्ही व इतर नातेवाईकांनी सांगितले. मुलीची देखिल तिथे नांदण्याची इच्छा होती. त्यावेळी आम्ही मुलीला नांदवुन घेणार नाही, घटस्फोट देणार असे म्हणाले व ते तिघे त्यांच्या घरी गेले. घरी गेल्यानंतर त्यांनी मुलीचे कपडे वरच्या मजल्यावरुन खाली फेकले. आम्ही मुलीला घरी सोडण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी तिला घरात येण्यास मज्जाव केला. त्यानंतर माझ्या मुलाने पोलीसांना फोन करुन घटना सांगितली. पोलीस घटनास्थळी आले. पोलीसांनी मुलीचे टाकलेले कपडे पाहिले. त्यानंतर पोलीसांनी आम्हास पोलीस ठाण्यात बोलावले. आम्ही तेथे प्रमुखांना सर्व घटना सांगितली. मुलीला मुका मार लागलेला होता. तिचा डावा हात सरळ करता येत नव्हता. पोलीसांनी तिला उपचारासाठी पाठवले. त्यावेळी तिचे नांव चुकीचे लिहले. आम्ही सांगितले परंतू तिचे चुकीचे नांव लिहले. त्यानंतर आम्ही मेडीकल करुन पोलीस ठाण्यात आलो. त्यावेळी पोलीसांच्या केबिनमध्ये मुलीचे सासु, सासरे व पती बसला होता. त्यावेळी त्यांची चर्चा झाली. त्यावेळी आम्ही आमची एफआयआर घ्या असे पोलीसांना सांगितले परंतू पोलीसांनी केवळ मारहाण, शिवीगाळ व धमकी अशी एनसी नोंदवुन घेतली. पोलीसांनी आम्हाला सांगितले की तुमच्या मुलीला धोका आहे, तुम्ही तिला तुमचे गावी घेवून जा. त्यावेळी मुलगी देखिल घाबरलेली होती. त्यानंतर आम्ही एनसी घेवुन आमचे गावी गेलो.

४. माझ्या मुलीचे सासरे डॉक्टर व माजी नगराध्यक्ष होते. त्यामुळे त्यांनी राजकिय दबाव वापरुन आमची एफआयआर नोंदवुन दिली नाही व भितीचे वातावरण तयार केले. त्यानंतर आम्ही मुलीला घेवुन घरी गेलो. माझ्या मुलीने जिल्हा पोलीस अधिक्षक सांगली यांना रजिस्टर निवेदन दिले. त्यानंतर पोलीस ठाण्याला पत्र गेले.

त्यानंतर गुन्हा रजिस्टर झाला. त्याआधी प्रस्तुत फिर्याद न्यायालयात दाखल केली होती. आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी.

**जबाब पूर्ण.**

माझेसमक्ष

BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE

Digitally signed by BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Date: 2025.08.02 16:47:55 +0530

——————————
साक्षीदाराची सही
दि.०२.०८.२०२५.

(श्रीमती बी.आर आवचारी दुर्गवडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव